।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

जनसंपर्क कार्यालय (PUBLIC RELATIONS OFFICE)

**Phone:** (02462) 229325 **Website:** www.srtmun.ac.in **E-mail:** srtmunpro1@gmail.com

संदर्भ क्र.: ज.का./२०२१-२२/६४ दि.२९/०६/२०२१

## 'स्वारातीम' विद्यापीठांतर्गत कार्यालयातील उपस्थिती ५० टक्के

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी सर्व संलग्नीत महाविद्यालये, विद्यापीठ परिसर आणि उपपरिसर येथील कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती (कोव्हीड-१९) 'कोरोना' विषाणूच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून ५० टक्के उपस्थिती २८ जून, पासून पुढील आदेशापर्यंत करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार राज्यात कोरोनाच्या डेल्टा प्लस विषाणूचे रुग्ण आढळून येत आहेत. या विषाणूचे संक्रमण रोखण्याच्या दृष्टीने विद्यापीठाशी संलग्नीत महविद्यालये, विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक संकुले, प्रशासकीय विभाग, लातूर येथील उपपरिसर, परभणी उपपरिसर, हिंगोली येथील न्यू मॉडेल डिग्री कॉलेज आणि किनवट येथील कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र इत्यादींना हा नियम लागू आहे. त्या-त्या जिल्ह्यातील मा. जिल्हाधिकारी वेळोवेळी जे आदेश निर्गमित करतील ते आदेश त्या-त्या जिल्ह्यातील विद्यापीठ परिसर, विभाग तसेच महाविद्यालयास लागू राहतील.

त्यानुसार विभाग प्रमुखांनी/ संचालकांनी अथवा प्राचार्यांनी अत्यावश्यक सेवा वगळता आपल्या विभागातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे ५० टक्के उपस्थितीचे आणि जे कर्मचारी घरी थांबणार आहेत त्यांना (वर्क फ्रॉम होम) करिता द्यावयाच्या कामाचे नियोजन करावे.

महाराष्ट्र शासनाकडून निर्गमित करण्यात आलेल्या आदेशानुसार कोरोना विषाणूचा प्रसार थांविण्याकरिता प्रत्येकांनी मास्क वापरावा, सॅनिटायझरने हात स्वच्छ करावे. आणि सामाजिक अंतराचे पालन करावे. असे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे यांनी कळविले आहे.

---

प्रति,<br>
मा. संपादक/ जिल्हा प्रतिनिधी,<br>
दैनिक<br>
सप्रेम नमस्कार,<br>
मान्यवर/ महोदय,<br>
उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्धीस देऊन सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,<br>
जनसंपर्क अधिकारी,<br>
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,<br>
ज्ञानतीर्थ, विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६.